M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education, Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.

Telephone : २७६५२४४५, २७६६२५०४, २७८८१०७७, २७८८१०७५, २७८९९९८७

Email : sschsc.mumbaiboard@gmail.com * Website : www.sscboardmumbai.in

क्र.मुंविमं/माध्य.प्रात्य/३०४/२३७९
नवी मुंबई-४००७०३
दि.०९/०६/२०२५

प्रति,

सर्व मान्यताप्राप्त शाळांचे मुख्याध्यापक,
जिल्हा मुंबई/ठाणे/पालघर/रायगड

विषय:- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) पुरवणी परीक्षा जून-जुलै २०२५ च्या प्रात्यक्षिक परीक्षेबाबत....

संदर्भ:- क्रमांक- रा.मं./परीक्षा-६/१७६५ यांचे दि. २२/०५/२०२५ चे पत्र.

विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेसंबंधी मुख्याध्यापकांनी करावयाची कामे

१. विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा मंगळवार दि. २४/०६/२०२५ ते मंगळवार दि. ०८/०७/२०२५ या कालावधीत प्रचलित पध्दतीने परीक्षा केंद्रावर न घेता त्यामध्ये बदल करण्यात येवून प्रात्यक्षिक परीक्षेचे नियोजन मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेतच करावे.
२. निश्चित केलेल्या वेळापत्रकाची एक प्रत विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी सूचना फलकावर परीक्षेपूर्वी लावण्यात यावी.
३. इ. १० वीच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी अंतर्गत व बहि:स्थ परीक्षकांची नियुक्ती मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेतील विषय शिक्षकांमधूनच करावी.
४. प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळी मुख्याध्यापकांनी शाळेत हजर राहून प्रत्याक्षिक परीक्षा व्यवस्थित ठरवून दिलेल्या तारखेस व वेळापत्रकाप्रमाणे सुरू झाली आहे किंवा नाही यावर लक्ष ठेवून त्यामध्ये कोणताही अनूचित प्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी.
५. तसेच प्रात्यक्षिक परीक्षेचे गुणदान फेब्रु-मार्च २०२५ च्या परीक्षेप्रमाणेच उत्तरपत्रिकेवर व OMR Sheet ऐवजी पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे आहेत.याबाबतची Link आपणास यथावकाश कळविण्यात येईल.

६. परीक्षा कालावधी मर्यादीत असल्याने प्रात्यक्षिक परीक्षा 'OUT OF TURN' ने आयोजित करण्यात येणार नाही त्यामुळे आपल्या शाळेतून प्रात्यक्षिक परीक्षेस प्रविष्ठ होणारा एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहाणार नाही याची दक्षता घ्यावी.

७. प्रात्यक्षिक परीक्षा संपल्यावर मंडळाने निर्धारित केलेल्या दिनांकास प्रात्यक्षिक उत्तरपत्रिका लिफाफ्यात सीलबंद करून जमा कराव्यात तसेच पोर्टलवर केलेल्या आँनलाईन गुणदानाची प्रत एका लिफाफ्यात जमा करावी.

८. विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रात्यक्षिक परीक्षेस उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांची सोबत पाठविलेल्या उपस्थिती अहवालावर (Attendance Sheet) स्वाक्षरी घेऊन सदर उपस्थिती अहवाल मंडळास पाठवावा. हजेरी प्रपत्रावर उपस्थित/अनुपस्थित विद्यार्थ्यांची नोंद बैठक क्रमांकानुसार (As per Serial Seat No) करण्यात यावी. विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत परीक्षकांनी विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी.विद्यार्थी गैरहजर असल्यास त्याच्या बैठक क्रमांकासमोर लाल शाईत गैरहजर (Absent) असा शेरा लिहून सदर प्रपत्र आपल्या सहीशिक्यासह स्वतंत्र लिफ्यामध्ये मंडळाकडे सादर करावे.

महत्वाच्या सुचना:-

९. (अ) अतिरिक्त बैठक क्रमांकाने प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांची हजेरी तक्त्यामध्ये नोंद करणे आवश्यक आहे. (विद्यार्थी उपस्थित असो किंवा अनुपस्थित नोंद घेणे आवश्यक आहे.

(ब) प्रात्यक्षिक परीक्षेसाठी देण्यात येणारी लेखन सामग्री (प्रात्यक्षिक उत्तरपत्रिका) प्रविष्ठ होणा-या विद्यार्थी संख्येपेक्षा जास्त देण्यात येते . ऐनवेळी परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांची संख्या वाढल्यास उत्तरपत्रिका कमी पडू नयेत याकरिता जादा उत्तरपत्रिका देण्यात येतात. शाळेकडून आवश्यकतेपेक्षा जादा उत्तरपत्रिकांवर त्यांच्या शाळेचे रबरी शिक्के उमटविल्याने पुढील परीक्षेकरिता सदर उत्तरपत्रिकांचा पुन्हा वापर करता येत नाही. यामुळे मोठ्या प्रमाणात लेखन सामुग्री वाया जाते याकरीता प्रात्यक्षिक परीक्षेसाठी आवश्यक तेवढयाच उत्तरपत्रिकांवर शाळेचे रबरी शिक्के उमटवावेत व काम पुर्ण झाल्यावर विना शिक्याच्या उर्वरित उत्तरपत्रिका कार्यालयास परत कराव्यात.

तसेच सर्व पुनर्परीक्षार्थ्यांना/श्रेणी सुधार योजने अंतर्गत प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक परीक्षेस प्रत्येक वेळी पुन्हा नव्याने प्रविष्ठ होणे अनिवार्य/आवश्यक राहील. मागील परीक्षेतील प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण पुढील परीक्षेसाठी कोणत्याही कारणास्तव ग्राहय धरले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

(ज्योत्स्ना शिंदे - पवार)
विभागीय सचिव (प्र)
मुंबई विभागीय मंडळ
वाशी, नवी मुबई ४००७०३